दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

भारताच्या सेंद्रिय पामिरा गुळाची बल्गेरियाला पहिली निर्यात

नवी दिल्ली : भारताच्या पारंपरिक आणि पौष्टिक अन्नपदार्थांनी आता जागतिक पातळीवर आपली पाळेमुळे घट्ट करण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारच्या वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयांतर्गत कार्यरत असलेल्या कृषी आणि प्रक्रिया-युक्त अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरणाद्वारे तामिळनाडूच्या इरोड जिल्ह्यातून तब्बल 1.755 मेट्रिक टन सेंद्रिय पामिरा गूळ पावडरची पहिली ऐतिहासिक खेप बल्गेरियातील 'वर्ना' शहराकडे दिमाखात रवाना करण्यात आली आहे.

परकीय शक्तींच्या मदतीने देशात अराजकता पसरवण्याचे विरोधकांचे मनसुबे

मुंबई: "विरोधक सुप्रीम कोर्टावर मोर्चे काढतात, चाल करुन जातात, पंतप्रधानांच्या घरासमोर आंदोलन करतात, दिल्लीत आंदोलन करतात. या आंदोलकांमागे परकीय शक्तींचा हात किंवा सहभाग दिसतो. विरोधकांना देशात अशांतता आणि अराजकता पसरवायची आहे. ते नेपाळ, बांग्लादेश, श्रीलंकेचे उदाहरण देतात हे कशाचे द्योतक आहे?", असा हल्लाबोल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी केला. ठाण्यात माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी दिल्लीतील विरोधकांच्या आंदोलनाचा खरपूस शब्दांत समाचार घेतला. शिंदे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या संविधानिक संस्थांचा अपमान करण्याचे काम विरोधी पक्ष नेते राहुल गांधी करत आहेत.

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. १७ ऑक्टोंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : १७६ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

44 कोटींपेक्षा अधिक व्हिजिट्ससह ऐतिहासिक सुरुवात

छत्रपती संभाजीनगर : ॲमेझॉनने आज जाहीर केले की 'ॲमेझॉन ग्रेट इंडियन फेस्टिव्हल 2026' ची ऐतिहासिक सुरुवात झाली असून, या शॉपिंग इव्हेंटची ही आतापर्यंतची सर्वात मोठी सुरुवात आहे. भारत ॲमेझॉन डॉट इन वर खरेदी करत असून, ग्राहक वार्षिक 100% पेक्षा जास्त उत्पादने ऑर्डर करत आहेत. या इव्हेंटच्या सुरुवातीच्या टप्प्यातच 44 कोटींपेक्षा अधिक व्हिजिट्सची नोंद झाली आहे, जी ॲमेझॉन डॉट इन च्या इतिहासातील सर्वोच्च आहे. भारतातील ग्राहक सणासुदीच्या वस्तू, दैनंदिन गरजा आणि स्मार्टफोन, कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स, फॅशन, ब्युटी, घर, किचन व इतर अनेक श्रेणींमध्ये अपग्रेड्सची खरेदी करत आहेत.या दमदार सुरुवातीतून देशभरातील वाढता सहभाग दिसून येतो; भारतातील प्रत्येक पिन कोडवरून ग्राहकांनी ऑर्डर्स दिल्या आहेत. एकूण व्हिजिट्सपैकी 72% पेक्षा जास्त व्हिजिट्स पहिल्या 9 महानगरांच्या पलीकडून आल्या, ज्यावरून संपूर्ण 'भारतात' ऑनलाइन खरेदीचा वाढता विस्तार स्पष्ट होतो. Amazon.in वर पहिल्यांदा खरेदी करणाऱ्या ग्राहकांची संख्या जवळपास 100% ने वाढली, तर ॲमेझॉन शॉपिंग ॲपने सामान्य दिवसाच्या तुलनेत 5 पट अधिक डाऊनलोड्ससह एका दिवसातील आतापर्यंतची सर्वोच्च डाऊनलोड्सची नोंद केली.

शेतकऱ्यांसाठी नव्या वीज पारेषण जाळ्यासोबत प्रगतीची संधी

धुळे :शेताच्या मध्यभागी वीज पारेषण टॉवर उभा राहिला, तर शेती थांबते का? याचे उत्तर आहे —नाही!धुळे जिल्ह्यात वीज पायाभूत सुविधांचा विस्तार होत असताना बळसाणे पॉवर ट्रान्समिशन प्रकल्पाच्या माध्यमातून एक महत्त्वाचा संदेश समोर येत आहे. तो म्हणजे, शेती आणि वीज पारेषण यंत्रणा यांचा सहअस्तित्वातून विकास शक्य आहे. शेती हा धुळे जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे शेतजमिनीतून वीज पारेषण वाहिन्या जाताना त्याचा शेतीवर काय परिणाम होईल, हा प्रश्न शेतकरी आणि जमीनधारकांसाठी स्वाभाविक आहे. टॉवर आणि वीजवाहिन्यांच्या उपस्थितीमुळे शेती करण्याच्या क्षमतेवर परिणाम होईल का, ही सर्वात सामान्य चिंता आहे.मात्र, वीज पारेषण टॉवर आणि वाहिन्या शेतातून गेल्या म्हणजे संपूर्ण शेतजमीन शेतीसाठी अनुपयोगी ठरते, असे नाही.

संयुक्त उपक्रमासाठी सामंजस्य करार

नवी दिल्ली: अदाणी समूहाची प्रमुख कंपनी अदाणी एंटरप्रायझेस लिमिटेड (एईएल) आणि जागतिक अभियांत्रिकी, पुरवठा साखळी व उत्पादन क्षेत्रातील कंपनी जॅबिल आयएनसी. (एनवायएसई: जेबीएल) यांनी भारतात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा सेंटर उपकरणांचे उत्पादन व असेंब्ली करण्यासाठी प्रस्तावित ५०:५० संयुक्त उपक्रमाची रूपरेषा निश्चित करणाऱ्या बंधनकारक नसलेल्या सामंजस्य करारावर (एमओयू) स्वाक्षऱ्या केल्या आहेत. प्रस्तावित संयुक्त उपक्रमासाठी अंतिम करारांची अंमलबजावणी, लागू असलेल्या आवश्यक मंजुरी मिळवणे आणि प्रचलित अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

पारेषण जाळ्याला रेसोनियाचे बळ

मुंबई - भारताचे स्वच्छ ऊर्जा संक्रमण केवळ अक्षय ऊर्जेची निर्मिती करण्यावर अवलंबून नाही, तर ही वीज विविध प्रदेशांमध्ये विश्वासार्हपणे पोहोचवण्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधांच्या उभारणीवरही अवलंबून आहे. 2030 पर्यंत 500 गिगावॅटस्थापित बिगर-जीवाश्म इंधनाधारित वीज निर्मिती क्षमतेचे लक्ष्य भारताने निश्चित केले असताना, अक्षय ऊर्जा स्रोतांपासून निर्माण होणारी वीज घरे, उद्योग, व्यवसाय आणि समुदायांपर्यंत पोहोचवण्यासाठी पारेषण यंत्रणांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

यापुढे ग्रामपंचायतीला पाणी टंचाई निवारण,चारा आणि शालेय सुविधांवर खर्च करावा लागणार - विभागीय आयुक्त जी श्रीकांत

ज्या ग्रामपंचायती गावच्या गरजेनुसार आपला निधी पाणी पुरवठा, जलसंधारण आणि शालेय भौतिक सुविधा यावर खर्च करणार नाहीत त्या वर नियमानुसार कायदेशीर कारवाई केली जाईल.
***जी. श्रीकांत* विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर विभाग**

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी**सद्यस्थितीत दुष्काळ सदृश्य परिस्थिती असल्याने टंचाई निवारणार्थ यापुढे ग्रामपंचायतीला पाणीटंचाई निवारण, चारा आणि शाळेतील सुविधांवर खर्च करावा लागणार असल्याच्या सूचना छत्रपती संभाजी नगर विभागाचे विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांनी दिल्या आहेत.

शुक्रवार दिनांक 16 ऑक्टोबर 2026 रोजी जिल्हा परिषद परभणी येथील सभागृहामध्ये विभागीय आयुक्त जी श्रीकांत यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी जिल्हाधिकारी संजय सिंह चव्हाण, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतिशा माथूर, अपर आयुक्त (स्थापना) दादासाहेब वानखेडे, सहाय्यक आयुक्त (विकास) डॉ. ज्ञानोबा मोकाटे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रश्मी खांडेकर, प्रकल्प संचालक डॉ. स्मिता पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) डॉ. संदीप घोन्सीकर यांच्यासह जिल्हा परिषदेतील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी पेन्शन अदालत, आश्वासित योजनांचा लाभ देणे, स्थायित्वाचा लाभ देणे, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारी निकाली काढणे, प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे निकाली काढणे, घरकुल योजना, जल जीवन मिशन याबाबत सविस्तर आढावा घेतला. तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या वतीने लावण्यात आलेल्या महिला बचत गटांच्या स्टॉलची पाहणी करून महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांचे कौतुकही यावेळी जी श्रीकांत यांनी केले.

पुढे बोलताना विभागीय आयुक्त जी श्रीकांत म्हणाले की, सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी ग्राम स्तरावर गावांना भेटी देऊन दुष्काळ नियंत्रणासाठी योग्य ते नियोजन करावे यासाठी जिल्हास्तरावर नियंत्रण कक्षाची स्थापना करावी अशा सूचना दिल्या. जलसंधारण आणि टंचाई निवारण मध्ये स्वयंसेवी संस्था, युवक मंडळे यांचा सहभाग नोंदवावा असे आवाहन केले . ज्या ग्रामपंचायती मध्ये पाणीटंचाई, चारा प्रश्न आणि शाळेतील भौतिक सुविधांच्या अडचणी आहेत त्या सर्वप्रथम सोडाव्यात त्या शिवाय सदर गावात इतर कुठल्याही योजनेतील कामे करू नयेत.

गरजू शेतकऱ्यांच्या मुलींचे विवाह समारंभ पार पाडण्यासाठी प्रशासनाच्या वतीने सामूहिक विवाह सोहळा कार्यक्रमाचे नियोजन तालुका किंवा गाव स्तरावर करण्या बाबत त्यांनी सूचित केले.

इमारत जुनी, खर्च सहा कोटींचा; वाल्मीच्या नूतनीकरणात नियमांची ऐशीतैशी!

1.93 कोटींची आगाऊ रक्कम दिल्याचा आरोप; तत्कालीन महासंचालकासह कंत्राटदारावर गुन्हा दाखल!

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : जनतेच्या पैशांचा विनियोग जनहितासाठी व्हावा, अशी अपेक्षा असते. मात्र, सरकारी निधीतून होणाऱ्या कामातच नियमांना बगल दिल्याचा आरोप समोर आला, तर जबाबदारी निश्चित करायची कुणावर? जल व भूमी व्यवस्थापन संस्था अर्थात वाल्मीच्या व्हीआयपी विश्रामगृहाच्या नूतनीकरण प्रकरणाने हाच सवाल उपस्थित केला आहे. सुमारे ४० वर्षे जुन्या इमारतीच्या नूतनीकरणासाठी सहा कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्चाचे अंदाजपत्रक, निविदा प्रक्रियेतील कथित अनियमितता, स्ट्रक्चरल ऑडिटचा अभाव आणि कंत्राटदाराला तब्बल १ कोटी ९३ लाख ५५ हजार ३५४ रुपयांची आगाऊ रक्कम दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी वाल्मीचे तत्कालीन महासंचालक विश्वनाथ बाबुनाथ नाथ आणि कंत्राटदार राजेश चव्हाण यांच्याविरुद्ध सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

जनतेच्या पैशांचा हिशेब कोण देणार?

वाल्मीच्या लेखाधिकारी सरला तानाजी देशमुख-कदम यांनी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. शासकीय पदाचा आणि अधिकाराचा कथित गैरवापर, संगनमत तसेच शासनाची फसवणूक केल्याच्या आरोपांवरून तत्कालीन महासंचालक विश्वनाथ बाबुनाथ नाथ आणि कंत्राटदार राजेश चव्हाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त मनीष कल्याणकर करीत आहेत. निविदा प्रक्रिया, कामाचे आदेश, आगाऊ रकमेचे वितरण आणि तांत्रिक परीक्षणातील निष्कर्ष यांची तपासणी झाल्यानंतर या प्रकरणातील वस्तुस्थिती स्पष्ट होईल.

वाल्मी येथील सुमारे ४० वर्षे जुन्या व्हीआयपी विश्रामगृहाच्या नूतनीकरणासाठी सहा कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. मात्र, या कामाची निविदा शासनाच्या महा ई-टेंडर या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याऐवजी खासगी Nextender India Pvt. Ltd. या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रक्रियेत शासकीय नियमांचे उल्लंघन झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

तत्कालीन महासंचालक विश्वनाथ नाथ यांनी संबंधित फाइलवर अंतिम स्वाक्षरी केली होती. त्यानंतर हे काम छत्रपती संभाजीनगरमधील प्रकाशनगर, सिडको येथील कंत्राटदार राजेश चव्हाण यांना देण्यात आले. निविदा प्रक्रियेतील कथित अनियमितता आणि काम देण्याच्या निर्णयाबाबत आता प्रश्न उपस्थित होत आहेत.

तीस वर्षांपेक्षा जुन्या इमारतीचे नूतनीकरण करण्यापूर्वी तिच्या संरचनात्मक सुरक्षिततेची तपासणी करणे आवश्यक असताना, कोणतेही स्ट्रक्चरल ऑडिट न करताच कामाचे आदेश देण्यात आल्याचा आरोप आहे. इमारतीची स्थिती आणि तिच्या सुरक्षिततेची खातरजमा न करता कोट्यवधींच्या कामाला मंजुरी कशी देण्यात आली, असा सवाल या प्रकरणातून उपस्थित होत आहे. त्यातच कंत्राटदाराला आगाऊ रक्कम देण्याची तरतूद नसतानाही तब्बल १ कोटी ९३ लाख ५५ हजार ३५४ रुपये आगाऊ अदा करण्यात आल्याचे फिर्यादीत नमूद आहे. शासकीय निधीच्या वापरासाठी नियम आणि आर्थिक शिस्त महत्त्वाची असताना एवढी मोठी रक्कम कोणत्या आधारावर देण्यात आली, याची चौकशी होणे आवश्यक आहे.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन मुंबईतील वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट अर्थात व्हीजेटीआयच्या पथकाकडून इमारतीचे तांत्रिक परीक्षण करण्यात आले. या अहवालात नूतनीकरणाचा खर्च प्रति चौरस फूट तब्बल ८ हजार ८९० रुपये येत असल्याचे नमूद करण्यात आले. हा खर्च नवीन बांधकामाच्या तुलनेतही अधिक असल्याचे अहवालातून निदर्शनास आल्याचे सांगण्यात आले आहे.

जागतिक बाजारपेठेत भारतीय औषध उद्योगांची प्रभावी कामगिरी - मुख्यमंत्री

मुंबई : "अमेरिका आणि युरोपसारख्या नियंत्रित बाजारपेठांमध्ये भारतीय औषधे, विशेषतः जेनेरिक औषधे, प्रभावी कामगिरी करत आहेत. यावरून भारतीय औषधनिर्मिती उद्योगाची जागतिक दर्जाची क्षमता स्पष्ट होते. देशात बल्क ड्रग पार्क विकसित करण्याचा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रयत्न महत्त्वपूर्ण असून, हे पार्क कार्यान्वित झाल्यानंतर औषधनिर्मिती क्षेत्रात मोठे परिवर्तन घडेल. औषधनिर्मिती, वैद्यकीय सेवा आणि मेडटेक क्षेत्रात नावीन्यामुळे मोठे बदल होत आहेत. आरोग्यसेवा अधिक सुलभ, परवडणारी आणि दर्जेदार करण्यासाठी नावीन्यपूर्ण संशोधन आवश्यक आहे", असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुंबईत ॲस्ट्राझेनेका फार्मा इंडियाच्या नवीन मुख्यालयाचे उदघाटन करण्यात आले. यापूर्वी कर्नाटकातील बंगळुरू येथे कंपनीचे मुख्यालय होते. या कार्यक्रमाला आमदार अतुल भातखळकर, ॲस्ट्राझेनेकाचे आशिया विभागाचे उपाध्यक्ष अरुण कृष्णा, ॲस्ट्राझेनेका इंडियाचे भारतातील अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक प्रवीण राव अक्किनेपल्ली व इतर मान्यवर उपस्थित होते. ॲस्ट्राझेनेकाचे अत्याधुनिक मुख्यालय मुंबईत सुरू झाल्यामुळे औषधनिर्मिती क्षेत्रातील संशोधन, नावीन्य आणि जागतिक सहकार्याला चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. कोविड महामारीच्या काळात भारताने 'कोविड मैत्री' उपक्रमातून ९९ देशांना लसींचा पुरवठा करून 'वसुधैव कुटुंबकम्'ची भावना जगासमोर मांडली. या प्रयत्नांमध्ये ॲस्ट्राझेनेकाचे योगदानही मोलाचे आहे. महाराष्ट्र सरकार उद्योगांसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यास कटिबद्ध आहे. उद्योगांची वाढ होते तेंव्हा राज्याचीही प्रगती होते, या भूमिकेतून महाराष्ट्र सरकार व्यवसायांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. तसेच, औषधनिर्मिती क्षेत्रातील संशोधन आणि नवोन्मेषासाठी महाराष्ट्रात अनुकूल वातावरण असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

वर्ल्ड इकॉनॉमिक फोरमच्या दौऱ्यादरम्यान स्वित्झर्लंडच्या आरोग्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेचा संदर्भ देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आरोग्यसेवेतील प्रगतीचे महत्त्व अधोरेखित केले.

नावीन्यपूर्ण संशोधनातून अचूक निदान, प्रभावी उपचार आणि उत्तम औषधे उपलब्ध होऊन नागरिकांचे आरोग्य व जीवनमान सुधारण्यास मदत होईल. ॲस्ट्राझेनेकाच्या मुंबईतील मुख्यालयामुळे नवीन औषधांचे संशोधन आणि उत्पादन यांना चालना मिळेल. महाराष्ट्रातील जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्था आणि विद्यापीठांशी कंपनीने भागीदारी करावी. यामुळे संशोधनाला गती मिळेल आणि तरुण संशोधकांच्या प्रतिभेचा उपयोग करून नावीन्याला प्रोत्साहन देता येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

जायकवाडी कालव्यातून अवैध उपसा करण्यास 15 डिसेंबरपर्यंत मनाई

पाथरी, मानवत, परभणी, गंगाखेड व पूर्णा तालुक्यांतील कालवा लाभक्षेत्राचा समावेश

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: जायकवाडी प्रकल्पाच्या पैठण मुख्य डावा कालवा व संबंधित शाखा कालवे, वितरिका आणि लघुवितरिकांमधून खरीप हंगाम २०२६-२७ साठी सुरू असलेल्या सिंचनाच्या पाणीवाटपात अनधिकृत हस्तक्षेप रोखण्यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला असून, तो 15 डिसेंबर २०२६ या कालावधीत लागू राहणार असल्याचे निर्देश अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी यांनी दिले आहेत.

अल निनोच्या प्रभावामुळे जिल्ह्यात निर्माण झालेली दुष्काळसदृश परिस्थिती आणि सिंचनाच्या पाण्याची वाढती मागणी लक्षात घेता, उपलब्ध पाण्याचे नियोजनबद्ध वितरण करणे आवश्यक आहे. कालव्याच्या शेवटच्या टोकावरील लाभधारकांनाही नियोजित पाणीपाळीनुसार पाणी मिळावे, तसेच उभ्या पिकांचे संरक्षण व्हावे, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

काही ठिकाणी लाभधारकांकडून पाणीवाटपात हस्तक्षेप करणे, अनधिकृतपणे पाणी घेणे, कालवा फोडणे अथवा कालव्याच्या बांधकामाचे नुकसान करणे अशा घटना घडत आहेत. यामुळे पाणीवाटपाचे नियोजन विस्कळीत होऊन पाण्याचा अपव्यय होतो आणि कालव्याच्या शेवटच्या टोकावरील लाभधारकांना पाणीपुरवठा करण्यात अडथळे निर्माण होतात. तसेच पाणीवाटप करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या शासकीय कामकाजातही अडथळे येतात. त्यामुळे सक्षम अधिकाऱ्याच्या परवानगीशिवाय कालव्याचे गेट उघडणे किंवा बंद करणे, गेट उचलण्याच्या यंत्रणेत अथवा संबंधित संरचनांमध्ये हस्तक्षेप करणे, कालव्याचे बांधकाम, भराव किंवा अस्तरीकरण फोडणे, कालव्यात अडथळे निर्माण करून पाण्याचा प्रवाह रोखणे अथवा अनधिकृतपणे वळविणे, तसेच कालव्याच्या संरचनांची तोडफोड किंवा नुकसान करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. याशिवाय, अधिकृत पाणीवाटप व कालव्याच्या देखभालीचे काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्यपालनात अडथळा निर्माण करणे किंवा त्यांना धमकावणे, यावरही प्रतिबंध घालण्यात आला आहे.

या आदेशाची अंमलबजावणी पैठण मुख्य डावा कालवा किमी १२२ ते २०८ या कार्यक्षेत्रातील मुख्य कालवा लाभक्षेत्रात करण्यात येणार आहे. त्यामध्ये वितरिका क्रमांक ४७ ते ६९ तसेच B-५९, B-६४, B-६७, B-६८ आणि B-७० या शाखा कालव्यांच्या शेवटच्या टोकावरील वितरिका व लघुवितरिकांचा समावेश आहे. या लाभक्षेत्रातील पाथरी, मानवत, परभणी, गंगाखेड व पूर्णा तालुक्यांतील संबंधित गावांना हा आदेश लागू राहणार आहे.

प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन होणार नाही, यासाठी पोलीस यंत्रणेने आवश्यक ती कार्यवाही करावी. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध नियमानुसार गुन्हे दाखल करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

जिंतूरात तीन तेल पॅकिंग कारखान्यांवर धाड; विक्रीसाठी तयार साठा सील



जिंतूर, प्रतिनिधी : खाद्यतेलाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाने शुक्रवारी (ता. १६) जिंतूर शहरातील तीन तेल पॅकिंग कारखान्यांवर संयुक्त कारवाई केली. या कारवाईत खुल्या तसेच पॅकिंग केलेल्या तेलाचे नमुने घेऊन तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. प्रयोगशाळेचा अहवाल येईपर्यंत विक्रीसाठी तयार असलेला तेलाचा साठा सील करण्यात आला आहे. शहरातील रस्त्यावरील अन्य कारखान्यावर छत्रपती संभाजीनगर व परभणी येथील अन्न सुरक्षा विभागाच्या पथकांनी एकाच वेळी तपासणी केली. विविध ठिकाणांहून टँकरद्वारे आणलेले खुले तेल पाऊच व कॅनमध्ये भरून स्वतःच्या ब्रँडने विकले जात असल्याच्या पार्श्वभूमीवर ही तपासणी करण्यात आली. लक्ष्मी ट्रेडिंग कंपनीतील 'लक्ष्मी गोल्ड' आणि अथर्व एजन्सीजमधील 'हेल्दी नेचर' वरद ऑइल या ब्रँडच्या तेलाचे नमुने घेण्यात आले.

"शाल जोडे"



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता'चा दणका : रस्त्यावर पाण्याचा टँकर धावला अखेर ठेकेदार अन् प्रशासनाला जाग

फर्दापूर प्रतिनिधी शेख हक्कानी





फर्दापूर ते तोंडापूर रस्ता कामाचा बोजवारा पाण्याविनाच निकृष्ट काम सुरू
अधिकाऱ्यांची एसी केबिनमधील कुंभकर्णी झोप चव्हाट्यावर

फर्दापूर ते तोंडापूर रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे सुरू असून रस्त्यावरील खडीवर पाण्याचा एक थेंबही मारला जात नसल्याची गंभीर तक्रार आणि वास्तव 'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता च्या माध्यमातून ठळकपणे मांडण्यात आले होते याणरिकामा आणि धोरणी कारभार चव्हाट्यावर आणणाऱ्या या खणखणीत बातमीचा मोठा वणवा पेटल्याने प्रशासनाला आणि संबंधित ठेकेदाराला अखेर घाम फुटला आहे

बातमी प्रसिद्ध होताच आणि प्रशासनाची पोलखोल झाल्यानंतर खडबडून जागी झालेल्या यंत्रणेने तात्काळ दखल घेत सदर रस्त्याच्या कामावर पाण्याचा टँकर बोलवून खडीवर पाणी शिंपडण्यास सुरुवात केली आहे

नेमके काय होते प्रकरण

फर्दापूर ते तोंडापूर या रस्त्याच्या कामासाठी शासनाकडून लाखो-करोडो रुपयांचा निधी खर्च केला जात आहे मात्र प्रत्यक्ष कामावर खडी व माती टाकून त्यावर पाण्याचा थेंबही मारला जात नसल्याचे भयानक चित्र समोर आले होते पाण्याविना रस्ता कसा मजबूत होणार आणि निकृष्ट कामामुळे काही दिवसांतच हा रस्ता उखडून जाईल असा संतप्त सवाल नागरिकांमधून विचारला जात होता तसेच अधिकारी एसी केबिनमध्ये बसून ठेकेदारांची बिले पास करत असल्याचा आरोपही करण्यात आला होता

बातमीचा दणका बसताच प्रशासनाची तंतरली

'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता ने या भ्रष्ट आणि ढिसाळ कारभारावर प्रकाश टाकणारी बातमी प्रसिद्ध करताच यंत्रणेची लाचखोर आणि कुंभकर्णी झोप उडाली वरिष्ठांच्या दबावानंतर आणि बातमीचा दणका बसल्यामुळे अखेर ठेकेदाराने घटनास्थळी पाण्याच्या टँकरची व्यवस्था करून रस्त्यावर पाणी मारण्याचे काम सुरू केले आहे

वृत्तपत्राच्या आणि पत्रकारितेच्या या दणक्यामुळे सर्वसामान्यांच्या प्रश्नांना कसा न्याय मिळतो याचे उत्तम उदाहरण या निमित्ताने फर्दापूर परिसरात पाहायला मिळत असून नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे भविष्यातही अशाच प्रकारच्या थर्ड क्लास कामांवर अंकुश ठेवण्यासाठी कडक नजर ठेवली जाईल असा इशारा ग्रामस्थांकडून देण्यात आला आहे

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

संविधानाचा आत्मा, शालेय शिक्षण आणि मूल्यनिष्ठ समाज

भारतीय संविधान हे केवळ एक कायदेशीर दस्तऐवज नसून ते देशाची एकता, अखंडता आणि लोकशाहीचा मूळ आत्मा आहे. विविधता, विविध भाषा, जाती, धर्म आणि संस्कृती असलेल्या आपल्या खंडप्राय देशाला समता, न्याय आणि समान संधीच्या सूत्रात बांधून ठेवण्याचे काम संविधानाने केले आहे. या पार्श्वभूमीवर, मुंबई महानगरपालिकेच्या भवानी शंकर मार्ग (दादर) येथील मुंबई पब्लिक स्कूलमध्ये 'स्मार्ट नागरिक' आणि 'विद्यार्थी प्रेरणा' या दोन महत्त्वपूर्ण पुस्तकांचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि सर्वोच्च न्यायालयाचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या हस्ते पार पडले. बालवयातच विद्यार्थ्यांच्या मनावर घटनात्मक संस्कार बिंबवणारा हा उपक्रम देशाच्या उज्वल भविष्यासाठी अत्यंत आश्वासक आणि काळाची गरज ओळखणारा आहे. शिक्षण म्हणजे केवळ परीक्षा उत्तीर्ण होणे, पदवी मिळवणे किंवा घोकंपट्टी करणे नव्हे, तर अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची आणि जबाबदारीने जगण्याची ताकद मिळवणे हा त्याचा खरा हेतू आहे. मुख्यमंत्री आणि माजी सरन्यायाधीशांनी स्वतः इयत्ता सहावीच्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांशी साधलेला थेट संवाद आणि पुस्तिकेतील धडे समजावून सांगणे, ही बाब अभूतपूर्व आहे. 'स्मार्ट नागरिक' पुस्तकातून हक्क, कर्तव्ये आणि नागरी जाणीवांचे धडे दिले जाणार आहेत, तर 'विद्यार्थी प्रेरणा' पुस्तकातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्याचा आणि विचारसरणीचा परिचय विद्यार्थ्यांना होईल. लहान वयातच सार्वजनिक मालमत्तेचे रक्षण, पर्यावरणाची काळजी, वीज-पाणी बचत आणि इतरांच्या अधिकारांचा आदर करण्याची वृत्ती रुजल्यास एक अत्यंत मूल्यनिष्ठ समाज निर्माण होईल. मुंबई महापालिकेने केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता, गुणवंत ५० विद्यार्थ्यांना सिंगापूर येथे 'स्टेम' (STEM) अभ्यासदौऱ्यावर पाठवण्याचे आणि पुस्तकांवर आधारित परीक्षेतील विजेत्यांचा १४ एप्रिल रोजी गौरव करण्याचे केलेले नियोजन कौतुकास्पद आहे. यामुळे महापालिका शाळांचा दर्जा उंचावण्यास आणि विद्यार्थ्यांची आकलनशक्ती वाढण्यास मोठी मदत होईल. संविधानातील स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही मूल्ये जेव्हा शाळांच्या वर्गखोल्यांमधून विद्यार्थ्यांच्या दैनंदिन आचरणात उतरतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने देशाच्या प्रगतीला गती मिळेल. हा उपक्रम केवळ मुंबईपुरता मर्यादित न राहता संपूर्ण राज्यभरातील सर्व शाळांमध्ये राबवला जावा, हीच काळाची मागणी आहे.

केंद्रीय समितीच्या दौऱ्यानंतर प्रशासन आणखी सक्रिय

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यामध्ये व सर्व तालुक्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थितीत केंद्र व राज्य शासनाच्या सनियंत्रणात वेगवेगळ्या उपाययोजना सुरू आहे.केंद्रीय पथकांच्या काही सूचनांना लक्षात घेऊन राज्य शासनाच्या नव्या सूचनेनुसार विभागीय स्तरावर महसूल प्रशासनाने संपूर्ण मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत दुष्काळ निवारणासाठी सूक्ष्म नियोजन; पाणी, चारा आणि ग्रामीण रोजगारावर भर देणे सुरू केले आहे.मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विभागातील आठही जिल्ह्यांमध्ये महसूल प्रशासनाने उपाययोजनांच्या नियोजनाला गती दिली आहे.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वात दुष्काळी परिस्थितीचा दररोज आढावा घेण्यात येत असून, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, पशुधनासाठी चारा, पीक नुकसानीची नोंद आणि ग्रामीण भागातील रोजगारनिर्मिती यांसारख्या महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

८ ते १० ऑक्टोबर २०२६ दरम्यान केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाने मराठवाड्यातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी केल्यानंतर दुष्काळाच्या परिणामांचे मूल्यांकन आणि आवश्यक उपाययोजनांच्या अंमलबजावणीसाठी प्रशासकीय स्तरावर अधिक समन्वयाने काम सुरू आहे.

आठही जिल्ह्यांत परिस्थितीवर लक्ष

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी आणि हिंगोली या आठही जिल्ह्यांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार दुष्काळ व्यवस्थापनाचे नियोजन केले जात आहे. जिल्हाधिकारी आणि संबंधित विभागांच्या यंत्रणांमार्फत पर्जन्यमानातील तूट, पिकांची स्थिती, भूजल पातळी, धरणांमधील पाणीसाठा, टँकरद्वारे पाणीपुरवठ्याची गरज आणि चाऱ्याची उपलब्धता यांचा आढावा घेतला जात आहे. तालुका व गावनिहाय परिस्थिती लक्षात घेऊन संभाव्य अडचणींचा अंदाज घेणे आणि त्यानुसार आवश्यक उपाययोजनांची पूर्वतयारी करणे, याला प्राधान्य देण्यात येत आहे.

केंद्रीय पथकाच्या दौऱ्यात पिकांची प्रत्यक्ष स्थिती, पावसातील खंडामुळे झालेले नुकसान, जलस्रोतांची उपलब्धता आणि ग्रामीण भागातील परिस्थितीची पाहणी करण्यात आली. या पाहणीतून उपलब्ध झालेली माहिती तसेच जिल्हा प्रशासनाकडील नोंदी यांच्या आधारे दुष्काळी परिस्थितीचे मूल्यांकन करण्याची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे.तशी ती गतिशील ही झाली आहे. पीक कापणी प्रयोग वेळेत पूर्ण करणे, नुकसानीच्या नोंदी अचूक ठेवणे आणि पात्र शेतकऱ्यांना लागू निकषांनुसार मदत मिळण्यासाठी आवश्यक कार्यवाही करणे, यावर प्रशासनाचा भर आहे.

पिण्याच्या पाण्याचे सूक्ष्म नियोजन

दुष्काळामध्ये सर्वात महत्त्वाचे ठरते ते पिण्याचे पाणी.



घरगुती वापराचे पाणी जनावरांना लागणारे पाणी आणि पुढील उन्हाळ्यापर्यंतची नियोजन याकडे प्रशासन लक्ष ठेवून आहे. पुढील काळात पाण्याचे दुर्भिक्ष वाढण्याची शक्यता लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचे नियोजन हा प्रशासनाच्या प्राधान्याचा विषय आहे. ज्या गावांमध्ये भूजल पातळी खालावली आहे किंवा नियमित पाणीपुरवठ्यात अडचणी निर्माण होण्याची शक्यता आहे, अशा ठिकाणच्या परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. टँकरद्वारे पाणीपुरवठा, आवश्यकतेनुसार विहिरी अधिग्रहित करणे, उपलब्ध जलस्रोतांचा योग्य वापर आणि पर्यायी पाणीपुरवठ्याची व्यवस्था यांसाठी स्थानिक गरजांनुसार नियोजन करण्यात येत आहे.

धरणे, तलाव, पाझर तलाव आणि अन्य जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा विचार करून पिण्याच्या पाण्याच्या वापराचे नियोजन आवश्यक आहे. पाणीटंचाईची तीव्रता वाढण्यापूर्वी संभाव्य टंचाईग्रस्त गावांची ओळख पटविणे, उपलब्ध साधनसामग्रीचा आढावा घेणे आणि गरज भासल्यास तातडीने उपाययोजना करता याव्यात, यासाठी संबंधित यंत्रणांमध्ये समन्वय ठेवला जात आहे. त्याचबरोबर पावसाचे पाणी अडविणे, भूजल पुनर्भरण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन आणि जलसंधारणाच्या कामांनाही महत्त्व आहे.

पशुधनासाठी चारा उपलब्धतेवर भर

दुष्काळाचा परिणाम केवळ शेतीपुरता मर्यादित राहत नाही. पशुधनाचे संगोपन करणाऱ्या शेतकरी कुटुंबांनाही चारा आणि पाण्याच्या उपलब्धतेसंदर्भात अडचणींचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे आठही जिल्ह्यांमध्ये चाऱ्याची सद्यस्थिती, उपलब्ध साठा आणि आगामी काळातील गरज यांचा आढावा घेणे महत्त्वाचे ठरत आहे.

संभाव्य चारा टंचाई लक्षात घेऊन चारा उपलब्धतेचे नियोजन, चारा उत्पादनासाठी आवश्यक उपाययोजना आणि पशुधनासाठी पाण्याची उपलब्धता यांचा एकत्रित विचार केला जात आहे. स्थानिक परिस्थितीनुसार चारा उत्पादनाला चालना देणे, उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करणे आणि टंचाईग्रस्त भागांतील गरजा वेळेत ओळखणे यावर संबंधित यंत्रणांचे लक्ष आहे. यामुळे शेतकरी कुटुंबांवरील आर्थिक ताण कमी करण्यासाठी आवश्यक उपाययोजना आखता येतील.

ग्रामीण रोजगारातून दुष्काळाचा सामना

दुष्काळी परिस्थितीत शेतीतील उत्पन्न घटण्याची शक्यता असल्याने ग्रामीण कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. रोजगार हमी योजनेंतर्गत जलसंधारण, मृदसंधारण, पाणी साठवण आणि अन्य मंजूर कामांचे नियोजन करून ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यावर भर दिला जात आहे. स्थानिक गरजांनुसार कामांची निवड करताना रोजगारनिर्मितीबरोबरच भविष्यातील पाणी उपलब्धतेसाठी उपयुक्त ठरणाऱ्या कामांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.

गावपातळीवरील पाणीटंचाई, शेतीची परिस्थिती आणि मजुरांची रोजगाराची गरज यांचा विचार करून कामांचे नियोजन करणे, हे प्रशासनासमोरील महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. जलसंधारणाची कामे पूर्ण झाल्यास पावसाचे पाणी साठविणे, जमिनीतील ओलावा टिकविणे आणि भूजल पुनर्भरणास मदत होऊ शकते. त्यामुळे तातडीच्या रोजगाराच्या गरजेला प्रतिसाद देतानाच दीर्घकालीन जलव्यवस्थापनासाठीही प्रयत्न केले जात आहेत.

समन्वयातून उपाययोजनांची अंमलबजावणी

दुष्काळ व्यवस्थापनासाठी महसूल, कृषी, जलसंपदा, भूजल सर्वेक्षण, पशुसंवर्धन आणि ग्रामीण विकास विभागांमधील समन्वय महत्त्वाचा आहे. विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हानिहाय परिस्थितीचा आढावा घेऊन स्थानिक गरजांनुसार उपाययोजनांचे नियोजन केले जात आहे. पाणी, चारा आणि रोजगार या तीन प्रमुख बाबींसोबतच पीक नुकसानीची अचूक नोंद, पीक विम्याशी संबंधित कार्यवाही आणि पात्र शेतकऱ्यांना नियमानुसार मदत मिळण्यासाठी आवश्यक प्रक्रिया यांवरही लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी तातडीच्या उपाययोजना आणि दीर्घकालीन नियोजन या दोन्हींची आवश्यकता आहे. केंद्रीय आंतरमंत्रालयीन पथकाच्या पाहणीनंतर परिस्थितीचे मूल्यांकन, उपलब्ध माहितीची पडताळणी आणि आवश्यक कार्यवाही यांना गती मिळाली आहे. आगामी काळातील संभाव्य पाणी व चारा टंचाईचा विचार करून आठही जिल्ह्यांमध्ये प्रशासनाकडून सुरू असलेले सूक्ष्म नियोजन, विभागीय समन्वय आणि गावपातळीवरील गरजांवर लक्ष केंद्रित करणाऱ्या उपाययोजना दुष्काळाचे परिणाम कमी करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहेत.

सुरेश पाटील
सहाय्यक संचालक
(माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर

परभणी जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन तर्फे राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धाचे उद्घाटन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी**क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद,जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,परभणी जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा 2026-27 चे आयोजन सुवर्ण जयंती सभागृह विद्यार्थी कल्याण अधिकारी कार्यालय वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथे दिनांक 14 ते 17 ऑक्टोबर 2026 या कालावधीमध्ये करण्यात आले आहे राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटन कार्यक्रमाप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू मा. श्री डॉ. चंद्रमणी साहेब हे उपस्थित होते तर प्रमुख उपस्थिती माननीय शेखर पाटील उपसंचालक क्रीडा व युवक सेवा छत्रपती संभाजी नगर विभाग छत्रपती संभाजीनगर आणि माननीय श्री डॉक्टर बाबासाहेब ठोंबरे मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी माननीय डॉक्टर राजेश कदम विद्यार्थी कल्याण अधिकारी मराठवाडा कृषी विद्यापीठ काव्यश्री जाधव मॅडम नियंत्रक मराठवाडा कृषी विद्यापीठ



प्राध्यापक डॉक्टर माधवराव शेजुळ छत्रपती पुरस्कार प्राप्त माननीय श्री कासाळकर एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर कृषी विद्यापीठ माननीय श्री मधुकर क्षीरसागर राज्य संघटक धनुष धनंजय बनसोडे सचिव परभणी जिल्हा बॉक्सिंग असोसिएशन माननीय श्री रंजीत काकडे अध्यक्ष शारीरिक शिक्षक संघटना माननीय श्री कैलाश माने सचिव शारीरिक शिक्षक संघटना श्री मिलन वैद्य कोषाध्यक्ष महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग संघटना श्री संघर्ष शिंगारे क्रीडा अधिकारी मराठवाडा कृषी विद्यापीठ श्री विजय ढोबळे राज्य क्रीडा मार्गदर्शक तांत्रिक समिती माननीय श्री अक्षय टेंभुरे राज्य क्रीडा मार्गदर्शक तांत्रिक समिती श्री कल्याण पोले जिल्हा क्रीडा अधिकारी परभणी यांची उपस्थिती होती

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री सुयश नाटकर क्रीडा अधिकारी श्री रोहन औडेकर क्रीडा अधिकारी श्री मिलिंद साळवे तालुका क्रीडा अधिकारी श्री गजानन तोडणे लिपिक प्रकाश पंडित योगेश आदमी धीरज नाईकवाडे आदींनी परिश्रम घेतले राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा यामध्ये आठ विभागातील खेळाडू तसेच क्रीडापीठ तील एकूण 300 खेळाडूंनी सहभाग नोंदवला

मतदार यादीत नाव कायम ठेवण्यासाठी पुरावे सादर करण्याचे आवाहन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : सध्या सुरू असलेल्या विशेष पुनरिक्षण (एसआयआर) प्रक्रियेतील टप्पा दोनअंतर्गत मतदार यादीतील लॉजिकल डिस्क्रिपन्सी व नो मॅपिंग या बाबींमध्ये आढळलेल्या मतदारांना आवश्यक पुरावे सादर करण्याबाबत नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र, नोटिसीला उत्तर दाखल करून मतदार यादीत नाव कायम ठेवण्यासाठी अद्याप आवश्यक कागदपत्रे सादर न केलेल्या मतदारांच्या याद्या जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अधिकृत (https://parbhani.gov.in/en/sir-2026/#1792070219876-5b20fe2d-04c0) संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संबंधित मतदारांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या यादीत आपले नाव तपासावे. यादीत नाव आढळल्यास, आपल्या मतदार यादीतील भाग क्रमांकाशी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याशी संपर्क साधून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. कागदपत्रांची पडताळणी व आवश्यक कार्यवाही पूर्ण करून मतदार यादीतील आपले नाव कायम ठेवण्यासाठी संबंधित मतदारांनी विहित मुदतीत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी संबंधित मतदारांना आवाहन केले आहे की, मतदार यादीतील आपले नाव कायम ठेवण्यासाठी नोटिसीला उत्तर दाखल करून आवश्यक पुरावे व कागदपत्रे तातडीने संबंधित बीएलओ यांच्याकडे सादर करावीत. मतदारांनी ही कार्यवाही न केल्यास उपलब्ध नोंदी व नियमांनुसार पुढील कार्यवाही होऊ शकते, याची नोंद घ्यावी.

मतदारांना आवश्यक माहिती, कागदपत्रांची पूर्तता, यादीतील नाव तपासणे तसेच संबंधित बीएलओचा संपर्क मिळविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळाचा वापर करता येईल. याशिवाय संबंधित तहसील कार्यालय, निवडणूक शाखा किंवा आपल्या भागातील बीएलओ यांच्याशी संपर्क साधून आवश्यक मदत घेता येईल. मतदारांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत संकेतस्थळावरील माहितीचा आधार घ्यावा आणि मतदार यादीत आपले नाव कायम ठेवण्यासाठी आवश्यक पुरावे विहित मुदतीत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

टोयोटा किर्लोस्कर मोटरने सादर केली नवी टोयोटा ग्लान्झा

नवी दिल्ली: टोयोटा किर्लोस्कर मोटर ने आज नव्या टोयोटा ग्लान्झाच्या लॉन्चची घोषणा केली. नव्या भारतातील बदलत्या आकांक्षा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आलेली ही स्टायलिश, फीचर्सनी परिपूर्ण आणि उत्कृष्ट मूल्य देणारी हॅचबॅक आहे. मागील पिढीच्या यशाला पुढे नेत, या नव्या मॉडेलमध्ये आकर्षक, अधिक शार्प आणि स्पोर्टी डिझाइन, प्रीमियम इंटिरियर्स, प्रगत कनेक्टिव्हिटी, अधिक सोयीस्कर फीचर्स आणि सर्वसमावेशक सुरक्षा टेक्नॉलजीचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामुळे प्रत्येक प्रवासाचा अनुभव अधिक समृद्ध होतो."व्हॉट्टा मूव्ह" या मोहीमेच्या संकल्पनेपासून प्रेरणा घेत, नवी टोयोटा ग्लान्झा ही शहरी तसेच ग्रामीण भागातील ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी विचारपूर्वक डिझाइन करण्यात आली आहे.

मोठी स्वप्ने पाहा, देशाच्या प्रगतीसाठी झटा!; शिवछत्रपती महाविद्यालयात डॉ. कलाम जयंती उत्साहात

विद्यार्थ्यांनी उलगडला 'मिसाईल मॅन'चा प्रेरणादायी जीवनप्रवास; संघर्ष, विज्ञान आणि देशनिष्ठेच्या विचारांना उजाळा

हिंदू प्रकाशवार्ता प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर

प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मोठी स्वप्ने पाहण्याची आणि कठोर परिश्रमांच्या बळावर ती साकार करण्याची प्रेरणा देणारे भारताचे माजी राष्ट्रपती व थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त शिवछत्रपती महाविद्यालयात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी डॉ. कलाम यांच्या संघर्षमय जीवनप्रवासापासून ते देशाच्या वैज्ञानिक प्रगतीतील योगदानापर्यंत विविध पैलूंवर विचार मांडले. त्यांच्या जीवनकार्याचे स्मरण करत विद्यार्थ्यांनी देशाच्या उभारणीत योगदान देण्याचा



संदेश या कार्यक्रमातून दिला.

विद्यार्थ्यांच्या मनोगतातून कलाम यांच्या विचारांना उजाळा

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सी. एस. पाटील होत्या. यावेळी उपप्राचार्या डॉ. एस. डी. राजमाने, उपप्राचार्य श्री. वहाटुळे, पर्यवेक्षक राहुल पाटील आणि अश्रुबा गवळी यांची उपस्थिती होती.

या प्रसंगी विद्यार्थिनी अंजली थोरवट, विद्यार्थी नोमान पठाण आणि विद्यार्थिनी श्रुती साळुंखे यांनी डॉ. कलाम यांच्या जीवनकार्यावर आपले विचार व्यक्त केले. संघर्षातून यश मिळविण्याचा त्यांचा प्रवास, विज्ञान क्षेत्रातील भरीव योगदान, देशाप्रती असलेली निष्ठा आणि तरुण पिढीला दिलेली प्रेरणा यावर विद्यार्थ्यांनी प्रकाश टाकला.

डॉ. कलाम यांनी आपल्या कार्यातून विज्ञान, शिक्षण आणि राष्ट्रनिर्मिती यांचा परस्परसंबंध अधोरेखित केला. त्यांच्या जीवनातून विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहण्याची, ध्येय निश्चित करण्याची आणि ती पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्याची प्रेरणा घ्यावी, असा संदेश या मनोगतांतून देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभागाच्या डॉ. मेघा तुपे यांनी केले, तर उपप्राचार्या डॉ. एस. डी. राजमाने यांनी आभार मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ॲग्रीस्टॅक फार्मर आयडीवर स्वतंत्र शेतकरी ओळखपत्र तयार करण्यास मनाई

सीएससी केंद्रचालकांना कृषी विभागाचे निर्देश

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत शेतकऱ्यांना प्राप्त झालेल्या फार्मर आयडीच्या आधारे स्वतंत्र शेतकरी ओळखपत्र तयार करणे आणि त्याचे वितरण करणे अनधिकृत असल्याचे केंद्र शासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व कॉमन सर्व्हिस सेंटर (सीएससी) चालकांनी अशा प्रकारे ओळखपत्रे तयार करणे व वितरित करणे तात्काळ थांबवावे, असे निर्देश कृषी विभागाकडून देण्यात आले आहेत.

केंद्र शासनाच्या ॲग्रीस्टॅक योजनेंतर्गत राज्यातील शेतकऱ्यांची डिजिटल ओळख प्रस्थापित करण्यासाठी फार्मर आयडी तयार करण्यात येत आहेत. मात्र, राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये या फार्मर आयडीच्या आधारे सीएससी केंद्रांमार्फत स्वतंत्र शेतकरी ओळखपत्रे तयार करून वितरित केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. अशा प्रकारच्या ओळखपत्रांसंदर्भातील व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित होत असल्याचेही निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने २५ ऑगस्ट २०२४ रोजीच्या पत्राद्वारे ॲग्रीस्टॅक अंतर्गत प्राप्त फार्मर आयडीच्या आधारे स्वतंत्र ओळखपत्र तयार करणे व त्याचे वितरण करणे अनधिकृत असल्याचे स्पष्ट केले आहे. राज्यातील सर्व सीएससी केंद्रचालकांनी अशा प्रकारची अनधिकृत कार्यवाही तात्काळ थांबवावी आणि भविष्यातही फार्मर आयडीच्या आधारे स्वतंत्र ओळखपत्रे तयार करून वितरित करू नयेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

उतेखोल येथे समावेशित शिक्षण संसाधन केंद्र व थेरपी रूमचे उदघाटन उत्साहात संपन्न!

बोरघर माणगाव, रायगड :* दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उतेखोल येथे समावेशित शिक्षण संसाधन केंद्र व थेरपी रूमचे उद्घाटन शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे उदघाटन मान.श्री विलासजी शिंदे सभापती,पंचायत समिती माणगाव व मान. श्रीमती मनीषाताई मालोरे, उपसभापती पंचायत समिती माणगाव, यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान.श्रीमती शुभदा पाटील, गटविकास अधिकारी,पंचायत समिती माणगाव, मान.श्री प्रसादजी पाटील, गट शिक्षण अधिकारी , पंचायत समिती माणगाव, मा. श्री.शंकरजी शिंदे केंद्रप्रमुख केंद्र उतेखोल,तालुका माणगाव यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी BRC ,पंचायत समिती माणगावचे



साधन व्यक्ती बाळकृष्ण पाटील सर ,श्री नंदू जाधव सर, सौ प्रज्ञा मात्रे मॅडम, MIS coordinator श्रीमती सोनाली धोंडुगडे मॅडम, श्री. अनिल वाघमारे सर विशेष शिक्षक ,श्रीमती सुनिता पवार मॅडम विशेष शिक्षिका, सौ श्रेया डांगे मॅडम विशेष शिक्षिका तसेच राजिप उतेखोल शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. सायली आंबुर्ले मॅडम उपस्थित होत्या. याशिवाय उतेखोल शाळेतील शिक्षक, विद्यार्थी ,दिव्यांग विद्यार्थी, त्यांचे पालक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. शंकर शिंदे केंद्रप्रमुख ,केंद्र उतेखोल यांनी केले. श्री अनिल वाघमारे सर व सौ श्रेया डांगे मॅडम यांनी समावेशित शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व कार्यात्मक प्रगतीसाठी संसाधन केंद्र व थेरपी रूमचा वापर व गरज याबाबत आवश्यकता स्पष्ट केली.

याप्रसंगी मा. श्री विलासजी शिंदे साहेब व सौ मनीषाताई मालोरे मॅडम यांनी आपले मनोगत व्यक्त करून या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी, त्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व त्यांनी आपल्या मनोगतातून अधोरेखित केले.

उतेखोल येथे सुरू करण्यात आलेले हे समावेशित शिक्षण संसाधन केंद्र व थेरपी रूम दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक मार्गदर्शन, आवश्यक सुविधा आणि अध्ययन-अध्यापनाच्या अधिक अनुकूल संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या क्षमतेनुसार शिकण्याची संधी मिळावी, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि त्यांचा सर्वांगीण विकास साधला जावा, या उद्देशाने या केंद्राची भूमिका मोलाची ठरणार आहे.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मॅडम विशेष शिक्षिका यांनी केले.

या उपक्रमामुळे माणगाव तालुक्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा मिळणार असून, समावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या दृष्टीने उतेखोल येथे उचललेले हे पाऊल निश्चितच महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथील ग्रंथालय विभागात वाचन प्रेरणा दिन साजरा



दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१६ ऑक्टोबर

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगाव येथे ग्रंथालय विभागात डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमात उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे यांच्या हस्ते डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम आणि ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.शियाली रामामृत रंगनाथन यांच्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी ग्रंथपाल डॉ.निर्मला बोराडे यांनी 'वाचाल तर वाचाल' या बोधवाक्य विषयी स्पष्टीकरण करून ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन केले वाचन प्रेरणा दिन या दिवशी का साजरा केला जातो याविषयी मनोगत व्यक्त केले.डॉ.चौधरी आणि डॉ.चोपडे लिखित पुस्तके ग्रंथालय विभागास भेट दिली.यावेळी डॉ.स्वामी मॅडम डॉ.तडवी,डॉ. जावळे,डॉ.गावडे,डॉ.संतोष पडघन.डॉ.मिसा,डॉ. मगर, आणि डॉ.वाघमारे आणि प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी अभिजीत सोनुने विद्यार्थी वैभव गोंड यांनी डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांचा सत्कार



सावळदबारा प्रतिनिधी : मन की बात' पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या लोकप्रिय कार्यक्रमाचे आयोजन सावळदबारा येथे करत असतात त्याबद्दल भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांचा सत्कार करण्यात आला. छत्रपती संभाजीनगर येथील भारतीय जनता पार्टी कार्यालय येथे भाजपचे पूर्व जिल्हाध्यक्ष सुरेश पांडुरंग बनकर, अल्पसंख्याक मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष राज्यमंत्री दर्जा इद्रिस मुलतानी ,आमदार सुहास शिरसाठ, आमदार अनुराधाताई चव्हाण यांनी केला भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांचा सत्कार जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्र जैस्वाल, जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर मोठे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या लोकप्रिय कार्यक्रमाचे आयोजन सावळदबारा येथे करत असतात त्याबद्दल भाजपचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते यांचा सत्कार करताना भाजपचे पूर्व जिल्हाध्यक्ष सुरेश पांडुरंग बनकर, भाजपचे अल्पसंख्याक मोर्चा प्रदेशाध्यक्ष राज्यमंत्री दर्जा इद्रिस मुलतानी,आमदार सुहास शिरसाठ, आमदार अनुराधाताई चव्हाण उपस्थित होते यावेळी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष रामुकाका शेळके, सभापती सर्जेराव मेटे, पंचायत समिती सभापती कल्याण गायकवाड,युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेश नरवडे,अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष किशोर जगताप, तालुका अध्यक्ष संजय पाटील, जिल्हा चिटणीस सुनिल गावंडे, गजानन पवार आदी होते

पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी मतदान प्रक्रियेचे काटेकोर पालन करा : अपर विभागीय आयुक्त डॉ. प्रताप काळे

पदवीधर मतदारसंघ निवडणुकीसाठी अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी: भारत निवडणूक आयोगाने 22 सप्टेंबर 2026 रोजी महाराष्ट्र विधान परिषदेच्या 05-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार 05-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-2026 प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी निवडणूक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्ये आणि जबाबदाऱ्या दक्षतेने पार पाडाव्यात, असे आवाहन अपर विभागीय आयुक्त डॉ. प्रताप काळे यांनी आज येथे केले.

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातील कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात जिल्ह्यातील क्षेत्रीय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण शुक्रवारी पार पडले. यामध्ये निवडणूक प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि नियमानुसार पार पाडण्यासाठी या प्रशिक्षणात विविध महत्त्वाच्या बाबींचे मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार, उपविभागीय अधिकारी जीवराज डापकर, संगीता चव्हाण व शैलेश लाहोटी, उपजिल्हाधिकारी अनिता भालेराव आणि सर्व तहसीलदार यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

या प्रशिक्षणासाठी अपर विभागीय आयुक्त डॉ. प्रताप काळे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील विविध टप्पे, मतदानाच्या दिवशी घ्यावयाची दक्षता, अधिकारी-कर्मचाऱ्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि निवडणूक आयोगाच्या निर्देशांचे पालन करण्याबाबत सविस्तर माहिती दिली. प्रत्यक्ष कामकाजात उद्भवू शकणाऱ्या संभाव्य परिस्थितींची उदाहरणे देऊन निवडणूक प्रक्रिया त्रुटीविरहित पद्धतीने पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना त्यांनी केल्या.

उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरुणा संगेवार यांनी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकाऱ्यांची कर्तव्ये, निवडणूक साहित्याची हाताळणी, मतदान प्रक्रियेतील महत्त्वाच्या बाबी आणि मतदान केंद्रावरील कामकाज करताना घ्यावयाची खबरदारी याबाबत तांत्रिक मार्गदर्शन केले. मतदानाच्या प्रत्येक टप्प्यावर निर्धारित नियम व कार्यपद्धतीचे पालन करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

प्रशिक्षणादरम्यान अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतपेटी हाताळण्याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे माहिती देण्यात आली. मतपेटी हाताळण्याची योग्य पद्धत, त्यासंदर्भातील खबरदारी आणि मतदान प्रक्रियेतील तांत्रिक बाबी समजावून सांगण्यात आल्या. त्यामुळे प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी जबाबदारी पार पाडताना प्रक्रियेतील त्रुटी टाळण्यास मदत होणार आहे.

या कार्यशाळेत निवडणूक प्रक्रियेतील विविध महत्त्वाच्या टप्प्यांची सविस्तर माहिती देत केंद्राध्यक्षांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या, मतदानाचे स्वरूप, मतपत्रिकेचा वापर, मतपेटी सीलबंद करण्याची कार्यपद्धती, फॉर्म क्रमांक सी-१६ भरण्याबाबतची दक्षता आदी विषयांवर त्यांनी मार्गदर्शन केले. मतदानासाठी वापरण्यात येणारी एक मतपेटी भरल्यानंतर दुसरी मतपेटी वापरताना घ्यावयाची खबरदारी, तसेच स्थळप्रतीवर उमेदवाराची स्वाक्षरी आवर्जून घेण्याचे महत्त्व स्पष्ट केले. मतदान प्रक्रियेदरम्यान कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी निवडणूकविषयक नियम, सूचनांचे आणि निर्धारित कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करण्याच्या सूचनाही डॉ. प्रताप काळे यांनी दिल्या.

०५-औरंगाबाद पदवीधर मतदारसंघासाठी शुक्रवार, दि. २३ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार आहे. मंगळवार, दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीत मतदारांना पसंतीक्रमानुसार मतदान करायचे असून, एकूण ४१ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणादरम्यान दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी करावी आणि मतदानाच्या दिवशी प्रत्येक टप्प्यावर आवश्यक दक्षता घेण्याच्या सूचना अपर विभागीय आयुक्त डॉ. प्रताप काळे यांनी दिल्या.

मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 1 ऑक्टोबर 2026 या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत दावे व हरकती दाखल करण्यासह त्यांचा निपटारा करण्याच्या प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ९५-जिंतूर विधानसभा मतदारसंघांतर्गत सेलू तालुक्यातील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्ष आणि पात्र मतदारांनी या सुधारित वेळापत्रकाची नोंद घ्यावी, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या १२ ऑक्टोबर २०२६ रोजीच्या पत्रानुसार आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांच्या कार्यालयाकडून प्राप्त निर्देशांनुसार हा बदल करण्यात आला आहे. असून, आता दावे व हरकती दि. 26 ऑक्टोबर 2026 पर्यंत दाखल करता येणार आहेत. तर नोटीस कालावधी आणि दावे व हरकतींचा निपटारा दि. १० नोव्हेंबरपर्यंत करता येणार आहे. सर्व दावे आणि हरकतींचा निपटारा झाल्यानंतर अंतिम मतदार यादी ही दि. १६ नोव्हेंबर २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.

मतदार यादीतील नाव, तपशील किंवा नोंदणीसंदर्भात आवश्यक कार्यवाही करण्यासाठी पात्र नागरिकांनी निर्धारित कालावधीत संबंधित प्रक्रियेत सहभागी व्हावे. मतदार नोंदणी व दुरुस्तीच्या प्रक्रियेत अधिकाधिक नागरिकांचा सहभागी व्हावे. मतदार यादीतील नोंदी अचूक व अद्ययावत राहण्यासाठी पात्र मतदारांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांनी केले आहे.

मुरघास निर्मिती प्रात्यक्षिकासाठी शेतकऱ्यांनी 23 ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी: कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), कृषी विभागामार्फत सन 2026-27 अंतर्गत संलग्न विभाग प्रात्यक्षिक कार्यक्रमांतर्गत मुरघास निर्मितीचे प्रात्यक्षिक आयोजित करण्यात येणार आहे. हे प्रात्यक्षिक प्राप्त लक्षांकाच्या अधीन राहून राबविण्यात येणार असून, मुरघास तयार करण्यासाठी आवश्यक बियाणे, मुरघास बॅग इत्यादींसाठी प्रति एकर 5 हजार 600 रुपये अनुदान देण्यात येणार आहे. एका शेतकऱ्यास जास्तीत जास्त एक एकर क्षेत्राच्या मर्यादित हे अनुदान देण्यात येईल.

या प्रात्यक्षिकासाठी दूध उत्पादनविषयक प्रशिक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांना तसेच गायी किंवा म्हशी असलेल्या शेतक-यांना प्राधान्य देण्यात येणार आहे. या प्रात्यक्षिकात सहभागी होण्यास इच्छुक शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज दि. 23 ऑक्टोबर 2026 पर्यंत संबंधित तालुक्याच्या तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सादर करावेत. प्राप्त अर्जांची संख्या उपलब्ध लक्षांकापेक्षा जास्त असल्यास सोडतीद्वारे शेतकऱ्यांची निवड करण्यात येईल, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविले आहे.

बुलडाणा अर्बन शाखा भराडी व अंभई शाखेच्या वतीने फराळ वाटप

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

सोयगाव,दि.१६ ऑक्टोबर

सामाजिक कार्यामध्ये सदैव अग्रेसर असणारी आशिया खंडातील सर्वात मोठी पतसंस्था बुलडाणा अर्बन संस्थेच्या शाखा भराडी व अंभई शाखेच्या वतीने दर वर्षी प्रमाणे दि.१६ शुक्रवार रोजी नवरात्र उत्सव जोगेश्वरी माता मंदिर घाटनांद्रा येथे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राधेश्याम चांडक उपाख्य भाईजी,बुलडाणा अर्बन संस्थेचे अध्यक्ष डॉ सुकेशजी झंवर,बुलडाणा अर्बन चॅरिटेबल सोसायटीच्या अध्यक्षा कोमलताई झंवर,सरव्यवस्थापक कैलास कासट यांच्या प्रेरणेतून विभाग सिल्लोड चे विभागीय व्यवस्थापक संजय दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली बुलडाणा अर्बन शाखा भराडी व अंभई



शाखेच्या वतीने जोगेश्वरी माता मंदिर (घाटनांद्रा) शहरातील तसेच खेड्यातून दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी फराळी चिवडा,राजगिरा लाडू वाटपाचे आयोजन करण्यात आले होते.कुलदैवत जोगेश्वरी माता मंदिर हे ठिकाण सिल्लोड तालुका आणि परिसरातील अनेक भाविकांचे तसेच खानदेश व मराठवाड्यातील कुटुंबाचे श्रद्धास्थान व कुलदैवत आहे येथे येऊन नवस मागितल्यास भक्तांच्या मनोकामना पूर्ण होतात अशी गाड श्रद्धा आहे.येथे बरेच भावी भक्त पायी येतात.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार करण्याकरि ता विभागीय व्यवस्थापक संजय दळवी,वरिष्ठ शाखा व्यवस्थापक गजानन झाल्टे,शाखा व्यवस्थापक विश्वास दळवी , जोगेश्वरी माता मंदिर संचालक मंडळ,कृष्णा मोरे,सुनील मोरे,सुरेश बिशेन,प्रकाश वारस्कर,सुखदेव भाग्यवंत कर्मचारी ईश्वर ठाले,संदीप म्हस्के,पंकज कुलकर्णी,राजेंद्र गोमटे,मोहन सपकाळ व दर्शनासाठी आलेले भाविक भक्त इत्यादी उपस्थित होते.

ह भ प अर्जुन तात्या साळुंके यांचे निधन



दैनिक हिंदू प्रकाश वार्ता

खुलताबाद प्रतिनिधी ह भ प अर्जुन तात्या साळुंके पाटील गोलटगावकर यांचे दि. १५ गुरूवार रोजी सायंकाळी निधन झाले ते ७५ होते त्यांच्यावर मागील आठ दिवसापासून वाळूज हॉस्पिटल सिडको या ठिकाणी उपचार चालू होते उपचारादरम्यान त्यांची निधन झाले. त्यांच्या पश्चात. एक मुलगा काकासाहेब साळुंखे. दोन मुली नातू परिवार होता त्यांनी गेल्या पंचवीस वर्षापासून गोलटगाव धार्मिक अध्यात्मिक सप्ताह कथा प्रवचन गोलटगाव ते पंढरपूर पायी दिंडी चालू करून अध्यात्मिक बाबतीत सतत पुढाकार घेऊन हा परिसर भक्तीमय केला यावेळी अनेक वारकरी संप्रदायातील प्रमुख पंचक्रोशीतून आलेले मोठा जनसमुदाय उपस्थितीत दि१६ शुक्रवार रोजी सकाळी ११ वा. अंतिम संस्कार करण्यात आले

स्वातंत्र्यसैनानी कै. बाबूरावजी काळे यांच्या स्मृतिदिनानिमित्त पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालयात विशेष व्याख्यान

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.१६ ऑक्टोबर - अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, माजी खासदार आणि मराठवाड्याच्या विकासासाठी मोलाचे योगदान देणारे कै.बाबूरावजी काळे ऊर्फ अप्पासाहेब यांच्या स्मृतिदिनानिमित्त पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, शिवाजीनगर (पूर्व), गारखेडा, छत्रपती संभाजीनगर येथे रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० वाजता विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या वेळी 'कै.बाबूरावजी काळे यांचे हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि राजकीय क्षेत्रातील योगदान' या विषयावर विशेष व्याख्यान होणार आहे. या व्याख्यानासाठी प्रमुख वक्ते म्हणून खुलताबाद येथील चिश्तिया कला व विज्ञान महाविद्यालयाचे माजी प्राचार्य प्रो.डॉ.शेख मोहम्मद एजाज आणि देवगाव रंगारी येथील आसारामजी भांडवलदार महाविद्यालयाच्या इतिहास विभागातील प्राध्यापक डॉ. विनोद बोरसे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष तथा छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे माजी सभापती ज्ञानेश्वर भांदुर्गे राहणार आहेत.तर प्रमुख पाहुणे म्हणून छत्रपती संभाजीनगर जिल्हा परिषदेचे अध्यक्ष द्वारकाभाऊ पाथ्रीकर उपस्थित राहणार आहेत.याप्रसंगी अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष रांगनाथ बाबूरावजी काळे आणि संस्थेचे सचिव प्रकाश बाबूरावजी काळे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पंडित नलावडे, अजिंठा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व सचिव तसेच संयोजन समितीच्या वतीने महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांनी या विशेष व्याख्यानास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शिरकळस येथे धान्य संकलन व विक्री केंद्राचे उद्घाटन उत्साहात संपन्न

महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मिळणार चालना

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी : महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), परभणी अंतर्गत उत्कर्ष लोकसंचालित साधन केंद्र, ताडकळस यांच्या मार्गदर्शनाखाली नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत भाग्यलक्ष्मी महिला बचत गट, शिरकळस यांच्या वतीने उपप्रकल्प (सब प्रोजक्ट)धान्य संकलन व विक्री केंद्राचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता शिरकळस येथे उत्साहात संपन्न झाला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माविमच्या जिल्हा समन्वय अधिकारी श्रीमती जया नेमाने उपस्थित होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून लेखा अधिकारी श्री. धनंजय कुलकर्णी, जिल्हा उपजीविका सल्लागार श्री. शरद कटारे, उत्कर्ष CMRC च्या अध्यक्षा श्रीमती शोभा राऊत, व्यवस्थापक श्रीमती गंगासागर भराड तसेच सरपंच मीरा माणिकराव भोसले यांची उपस्थिती होती. यावेळी गावातील बचत गटांच्या महिला तसेच महिलांचे कुटुंबीय आणि शेतकरी पुरुष मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गंगासागर भराड यांनी केले, तर प्रास्ताविक श्री. शरद कटारे यांनी केले. उपस्थित मान्यवरांनी महिलांना मार्गदर्शन करताना महिला बचत गटांचे संघटन, आर्थिक स्वावलंबन, उद्योजकता विकास आणि शेतीमालाच्या संकलन व विक्री व्यवस्थेचे महत्त्व विशद केले.

ग्रामीण भागातील महिलांना व्यवसायाच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे, शेतमाल व धान्य संकलनासाठी संघटित व्यवस्था निर्माण करणे आणि महिलांच्या उत्पन्नात वाढ घडवून आणणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. धान्य संकलन व विक्री केंद्रामुळे महिला बचत गटांना व्यवसायाची नवी दिशा मिळून ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळण्यास मदत होणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अर्चना भोसले, रोहिणी भोसले, प्राजक्ता घटमाळ, ज्योती चौरे तसेच भाग्यलक्ष्मी महिला बचत गटातील सर्व महिलांनी विशेष सहकार्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी लक्ष्मण भोसले यांनी उपस्थितांचे आभार मानले. महिलांचे संघटन, आर्थिक स्वावलंबन आणि ग्रामीण उद्योजकतेला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम शिरकळस परिसरातील महिलांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

टंचाईग्रस्त गावांत विहीर अधिग्रहण व टँकर सुरू करण्यासाठी तातडीने कार्यवाही करा!

आमदार अब्दुल सत्तार यांच्या तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना सूचना



सिल्लोड (प्रतिनिधी) दि.15, सिल्लोड-सोयगाव तालुक्यात दुष्काळाची गंभीर परिस्थिती निर्माण होत असून, पाणीटंचाईमुळे नागरिकांसह शेतकरी आणि पशुधनासमोर विविध समस्या उभ्या राहत आहेत. या पार्श्वभूमीवर टंचाईग्रस्त गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी विहीर अधिग्रहण व टँकर सुरू करण्याची प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करून प्रत्यक्ष टँकर सुरू करावेत, अशा सूचना माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार यांनी तहसीलदार आणि गटविकास अधिकारी यांना दिल्या आहेत.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आमदार अब्दुल सत्तार यांनी सिल्लोड तालुक्यातील बोरगाव कासारी, तलवाडा, निल्लोड आदी गावांना भेटी देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला व त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. यावेळी ग्रामस्थांनी गावातील पाणीटंचाईसह दैनंदिन जीवनात भेडसावणाऱ्या विविध समस्यांकडे त्यांचे लक्ष वेधले. पिण्याच्या पाण्यासाठी नागरिकांना करावी लागणारी धावपळ लक्षात घेता, टंचाईग्रस्त गावांमध्ये आवश्यकतेनुसार टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यंदाच्या दुष्काळी परिस्थितीचा शेती आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही परिणाम होत असून, पिकांचे नुकसान, जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता आणि पशुधन जगविण्याचे आव्हान शेतकऱ्यांसमोर आहे. पाणीटंचाईमुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ पिण्याच्या पाण्यापुरते मर्यादित न राहता, दुष्काळामुळे निर्माण होणाऱ्या सर्व समस्यांचा आढावा घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याची गरज आहे.

गावभेटीदरम्यान ग्रामस्थांनी मांडलेल्या समस्यांची दखल घेत आमदार अब्दुल सत्तार यांनी संबंधित यंत्रणेला पाणीटंचाई निवारणासाठी आवश्यक प्रशासकीय कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या. तसेच दुष्काळामुळे नागरिक, शेतकरी आणि पशुधनाला भेडसावणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी परिस्थितीनुसार आवश्यक उपाययोजना करण्यावर भर दिला.

याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक नंदकिशोर सहारे, माजी उपनगराध्यक्ष विनोद मंडलेचा, युवा सेनेचे अक्षय मगर, प्रवीण मीरकर, रामदास साळवे, विजय खाजेकर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात 'अभिजात मराठी भाषा : वर्तमान आणि भविष्य' विषयावर विशेष व्याख्यान संपन्न

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी



सोयगाव,दि.१६ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्था संचलित संत ज्ञानेश्वर महाविद्यालय, सोयगाव येथील मराठी विभागाच्या वतीने अभिजात मराठी भाषा सप्ताह २०२६ अंतर्गत दि.१६ शुक्रवार रोजी 'अभिजात मराठी भाषा वर्तमान आणि भविष्य' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख व्याख्याते दौलतसिंग परदेशी यांनी 'अभिजात मराठी भाषा - वर्तमान आणि भविष्य' या विषयावर विचार मांडले. मराठी भाषेची ऐतिहासिक परंपरा, तिचे वर्तमानातील स्थान आणि आधुनिक काळातील आव्हाने यांवर त्यांनी प्रकाश टाकला. मराठी भाषेचे जतन, संवर्धन आणि नव्या पिढीमध्ये भाषेविषयी अभिमान निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.शिरीष पवार यांनी मराठी भाषेचे सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. अभिजात भाषेचा दर्जा ही मराठी भाषेसाठी अभिमानाची बाब असून, तिच्या विकासासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करून वाचन, लेखन आणि साहित्यसंवर्धनाची परंपरा समृद्ध करावी, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ.रमेश औताडे यांनी प्रास्ताविकातून अभिजात मराठी भाषेचा समृद्ध वारसा, तिची साहित्यिक परंपरा आणि सांस्कृतिक महत्त्व विशद केले.मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यामुळे निर्माण झालेल्या संधींचा उल्लेख त्यांनी केला. तसेच मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आणि प्रचार-प्रसारासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.ज्योती स्वामी यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. शिवाजी सिरसाट यांनी केले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

एमजीएम विद्यापीठात 'स्वयंभू 2026' महोत्सवाचे उद्घाटन

विद्यार्थ्यांनी तांत्रिक ज्ञानासह व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करावीत : राहुल धूत



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : महात्मा गांधी मिशन (एमजीएम) विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या (जेएनईसी) 'स्वयंभू २०२६' महोत्सवाचे उद्घाटन शुक्रवारी रुक्मिणी सभागृहात झाले. धूत ट्रान्समिशन्सचे व्यवस्थापकीय संचालक राहुल धूत यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. अभियांत्रिकी क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी मूलभूत तांत्रिक ज्ञानासोबत व्यावहारिक कौशल्ये आत्मसात करावीत, असे आवाहन धूत यांनी यावेळी केले.

कार्यक्रमाला आर. के. फार्मा इन्क. ग्रुप ऑफ कंपनीचे प्रमुख डॉ. नंदकुमार पाटील, कालिका स्टीलचे संचालक यश गोयल, पोर्टिको डिझाइन कॉन्सेप्टचे मुख्य वास्तुविशारद गोपाल तनवानी आणि फिनटेक इंजिनिअर्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी सलील बंगाळे उपस्थित होते. तसेच एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर आणि प्राचार्या डॉ. विजया मुसांडे यांची उपस्थिती होती.

उद्घाटनानंतर 'इंजिनिअरिंग फ्युचर्स : नेव्हिगेटिंग करिअर्स, इनोव्हेशन अँड आंत्रप्रेन्योरशिप' या विषयावर परिसंवाद झाला. यात विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी क्षेत्रातील करिअरच्या संधी, नवकल्पना, उद्योजकता आणि बदलत्या तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कृत्रिम बुद्धिमत्तेचा सजग वापर, समस्या सोडविण्याची क्षमता, निर्णयप्रक्रिया आणि नेतृत्वगुण यांवरही चर्चा झाली.

गोपाल तनवानी यांनी पहिल्या ग्राहकासोबत काम करताना मिळणाऱ्या अनुभवाचे महत्त्व सांगितले. यश गोयल यांनी व्यवसायात बदलते तंत्रज्ञान स्वीकारण्याची आवश्यकता स्पष्ट केली. सलील बंगाळे यांनी कामात स्वतःहून पुढाकार घेणे हे नेतृत्वाचे पहिले पाऊल असल्याचे सांगितले, तर डॉ. नंदकुमार पाटील यांनी पदवी शिक्षणाच्या काळात सातत्यपूर्ण प्रयत्नांतून यशाचा पाया मजबूत करण्याचे आवाहन केले. विभागप्रमुख डॉ. एम. एस. कदम यांनी आभार मानले.

छत्रपती संभाजीनगरात 23 ऑक्टोबरपासून महाक्रिटिकॉन-2026

150 तज्ज्ञांचे मार्गदर्शन; 700 हून अधिक डॉक्टरांचा सहभाग, तीन दिवस चालणार राज्यस्तरीय परिषद

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : इंडियन सोसायटी ऑफ क्रिटिकल केअर मेडिसिन (आयएससीसीएम)च्या छत्रपती संभाजीनगर शाखेतर्फे १४व्या राज्यस्तरीय क्रिटिकल केअर परिषदेचे (महाक्रिटिकॉन-२०२६) आयोजन २३ ते २५ ऑक्टोबरदरम्यान हॉटेल रामा इंटरनॅशनल येथे करण्यात आले आहे. या परिषदेत राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील सुमारे १५० तज्ज्ञ मार्गदर्शन करणार असून, देशभरातून ७०० हून अधिक डॉक्टर आणि प्रतिनिधी सहभागी होणार आहेत, अशी माहिती आयोजन अध्यक्ष डॉ. श्रीकांत सहस्रबुद्धे यांनी दिली.

परिषदेचे आयोजन सचिव तथा आयएससीसीएमचे छत्रपती संभाजीनगर शाखाध्यक्ष डॉ. योगेश लक्कस, आयोजन उपाध्यक्ष डॉ. प्रशांत वळसे आणि संयुक्त सचिव तथा प्रश्नमंजुषा संचालक डॉ. राहुल चौधरी यांनी परिषदेची माहिती दिली. पदव्युत्तर विद्यार्थी, अतिदक्षता तज्ज्ञ, भूलतज्ज्ञ, फिजिशियन, फुफ्फुसविकार तज्ज्ञ आणि क्रिटिकल केअर क्षेत्रातील व्यावसायिकांना आधुनिक उपचारपद्धतींचे ज्ञान मिळावे, हा परिषदेचा उद्देश आहे.

परिषदेच्या पहिल्या दिवशी, २३ ऑक्टोबरला विविध प्रशिक्षण कार्यशाळा होणार आहेत. यामध्ये प्रगत श्वसनमार्ग व्यवस्थापन, यांत्रिक श्वसन सहाय्य (मेकॅनिकल व्हेंटिलेशन), ईसीएमओ, सीआरआरटी, प्रक्रियाधारित क्रिटिकल केअर आणि पीओसीयूएस या विषयांवर प्रात्यक्षिकांसह प्रशिक्षण दिले जाणार आहे. मॉडेलच्या साहाय्याने मेकॅनिकल व्हेंटिलेशनचे विशेष प्रात्यक्षिकही होईल.

२४ आणि २५ ऑक्टोबरला तज्ज्ञांची व्याख्याने, संवादात्मक सत्रे, रुग्णांच्या प्रकरणांवर आधारित चर्चा, परिसंवाद, वादविवाद आणि अतिदक्षता विभागातील संशोधनावर चर्चा होणार आहे. सुमारे १०० विद्यार्थी संशोधन निबंध सादर करणार आहेत.

डॉ. शिरीष प्रयाग, डॉ. आशित हेगडे, डॉ. राहुल पंडित, डॉ. जिग्नेश दिवातिया, डॉ. खुश्रव बजान आणि डॉ. दीपक गोविल यांच्यासह अनेक राष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. आयएससीसीएमचे अध्यक्ष डॉ. रणवीरसिंह त्यागी, माजी अध्यक्ष डॉ. श्रीनिवास सामवेदम, डॉ. राजेश मिश्रा यांच्यासह देशातील विविध मान्यवर सहभागी होणार आहेत. सिंगापूरचे प्रा. डॉ. अमित कंसल, दुबईचे डॉ. अमिताभ कुलकर्णी आणि नेपाळचे डॉ. सुभाषप्रसाद आचार्य हे आंतरराष्ट्रीय तज्ज्ञही परिषदेत सहभागी होतील.

परिषदेच्या आयोजन समितीत डॉ. साधना कुलकर्णी, डॉ. एस. एच. तालीब, डॉ. पी. वाय. मुळे, डॉ. सुधीर कुलकर्णी, डॉ. प्रमोद भाले, डॉ. उमेश गवळी, डॉ. फरान देशमुख, डॉ. अजिंक्य देशमुख, डॉ. नंदकुमार नील, डॉ. अमित बाळेराव, डॉ. गोपाल भट्टड, डॉ. सुधीर देशपांडे, डॉ. कृष्णा देशपांडे, डॉ. अविनाश कचरे, डॉ. संदीप सानप, डॉ. विनोद चव्हाण, डॉ. गितेश दळवी, डॉ. अंकुश कोल्हे, डॉ. ज्योती खर्चे, डॉ. अजित अन्नछत्रे, डॉ. बिना डॅनियल, डॉ. संजय पाटणे, डॉ. मंगला बोरकर, डॉ. प्रफुल्ल पांडे आणि डॉ. गायत्री तडवळकर यांचा समावेश आहे.

राज्यस्तरीय रग्बी स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगरचे तीन संघ जाहीर

14 वर्षांखालील मुले, मुली आणि वरिष्ठ महिला संघातील खेळाडूंना संधी; 17 व 18 ऑक्टोबरला मुंबईत स्पर्धा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : मुंबई येथील बॉम्बे जिमखाना येथे १७ व १८ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय रग्बी अजिंक्यपद स्पर्धेसाठी छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे १४ वर्षांखालील मुले, १४ वर्षांखालील मुली आणि वरिष्ठ महिला संघ जाहीर करण्यात आले आहेत. जिल्ह्यातील निवड चाचणीतून या तिन्ही संघांची निवड करण्यात आली.

पीईएस महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर जिल्हा रग्बी असोसिएशनचे सचिव श्याम अंभोरे आणि रियाजुद्दीन मोहम्मद यांच्या मार्गदर्शनाखाली निवड चाचणी घेण्यात आली. या प्रक्रियेला ऑलिम्पिक असोसिएशनचे अध्यक्ष पंकज भारसाखळे आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी सूर्यवंशी यांचे मार्गदर्शन लाभले.

१४ वर्षांखालील मुलांचा संघ : साई सुरासे, रितेश घाडगे, प्रथमेश गिर्हे, तौसिफ शाका, चैतन्य थोरात, विपुल हिंगाडे, समर्थ मोरे, विवेक रोकडे, अथर्व झालके, रिहान शेख, आदित्य राऊत आणि यश राऊत.

१४ वर्षांखालील मुलींचा संघ : वैष्णवी कुमारी, आराध्या नवले, प्राची शिंदे, गुंजन बक्वाल, पूनम खरात, रीतिका टेकाळे, प्राची पवार, आकांशा देवशेते, तनुजा जाधव, प्रेरणा गहिरे, संस्कृती भुमे आणि शेख अल्फिया.

वरिष्ठ महिला संघ : दिव्या गवळी, भाग्यश्री मुळे, आशिया शेख, गौरी जमधडे, निशिगंधा तराटे, रसकन्या पवार, मृणाल पडोलसे, प्रतिक्षा खरे, अनुराधा खरात आणि अमृता अंभोरे.

सविता चौधरी संघाच्या प्रशिक्षक, तर रामेश्वर छायल संघ व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळणार आहेत.

छत्रपती संभाजीनगर रग्बी असोसिएशनचे अध्यक्ष रोहित देशपांडे, उपाध्यक्ष तथा उद्योजक अनुराग सावे, सहसचिव डॉ. केजल भारसाखळे आणि प्रवीण अग्रवाल यांनी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. राज्यस्तरीय स्पर्धेत खेळाडू उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचा नावलौकिक वाढवतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आर्ट ऑफ लिव्हिंगतर्फे महागणपती, नवग्रह व वास्तू होम

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर : 'द आर्ट ऑफ लिव्हिंग' (वैदिक धर्म संस्थान), छत्रपती संभाजीनगरच्या वतीने शाहनूरवाडी येथील त्रिलोक सिंह जबिंदा लॉन्स येथे आयोजित नवरात्रोत्सव व चंडी होम महोत्सवाला शुक्रवारी उत्साहात प्रारंभ झाला. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी श्री महागणपती होम, नवग्रह होम आणि वास्तु होम वैदिक मंत्रोच्चारांत शास्त्रोक्त पद्धतीने संपन्न झाले.

स्वामी निर्मयानंदजी यांच्या प्रेरणेने आणि उपस्थितीत झालेल्या या धार्मिक अनुष्ठानात डॉ. अजित हजारी व सौ. नमिता हजारी तसेच सीए सचिन लोया व सौ. लोया यांनी मुख्य यजमानपद भूषविले. कार्यक्रमासाठी जागा उपलब्ध करून देणारे त्रिलोक सिंह जबिंदा यांचीही प्रमुख उपस्थिती होती. या सोहळ्यात शहरातील सुमारे ३०० ते ४०० भाविक आणि साधक सहभागी झाले.

अनुष्ठानानंतर आयोजित सुमधुर सत्संगामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले. उपस्थितांना ध्यान, भक्ती आणि साधनेच्या माध्यमातून आध्यात्मिक अनुभूती घेता आली.

कोहिनूर महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिन निमित्त ग्रंथ प्रदर्शन आणि एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन

दैनिक हिंदू प्रकाश वार्ता



कोहिनूर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न महान शास्त्रज्ञ डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनाचे उदघाटन महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्य प्रो. डॉ.कमरुनीसाबेगम यांच्या हस्ते करण्यात आले व दिनांक १६ /१०/ २०२६ रोजी ग्रंथालय विभागाच्या वतीने एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले या कार्यशाळेचा विषय "कृत्रिम बुद्धिमत्ता साक्षरता त्याचा मौलिक वापर आणि स्मार्ट संशोधन डेटाबेस एकत्रीकरण" या विषयावर विवेकानंद महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रो.डॉ. गोवर्धन औटी हे प्रमुख पाहुणे व व्याख्याते म्हणून उपस्थित होते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना त्यांनी आपल्या मनोगतात एआय साक्षरता म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान कसे काम करते हे समजून घेणे त्याचे मूल्यमापन करणे आणि त्याचा दैनंदिन जीवनात प्रभाविपणे वापर करण्याची क्षमता होय

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्र.प्राचार्य प्रो. डॉ.कमरूनींसा बेगम होत्या तर व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रफिल्लाह खान व डॉ. जिते सुभाष व ग्रंथपाल प्रो. डॉ. सारिका रेणुगुंटवार उपस्थित होत्या कार्यक्रमाचे पाहुण्यांचा परिचय ग्रंथपाल डॉ. सारिका रेनगुंठवार यांनी करून दिला यावेळी शेख मुस्कान व शेख रेहान या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले या दोन्ही विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रोत्साहन पर पुस्तक भेट देऊन गौरविण्यात आले अध्यक्ष समारोपात महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. रफिउल्लाह खान यांनी केला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. प्रशांत तेरकर यांनी केले तर आभार डॉ.शेख मोहम्मद अरिफ यांनी मानले यावेळी महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

तुळजाभवानीचे उपपीठ जगदंबा माता : डोंगर रांगांच्या कुशीत निसर्गरम्य स्थळी भोगावचे पुरातन मंदिर

जिंतूर, ता.१३ (बातमीदार): शहरापासून बारा किलोमीटरवरील औंढा नागनाथ महामार्गावर भोगाव फाट्यासून तीन किलोमीटरवर सह्याद्री डोंगर रांगांच्या कुशीत निसर्गरम्य स्थळी दगडी बांधकाम असलेले श्री, जगदंबा मातेचे पुरातन मंदिर आहे. श्री तुळजाभवानीचे उपपीठ म्हणून ओळख असून असंख्य भाविकांचे श्रध्दास्थान आहे. मंदिराच्या गाभाऱ्यात चार फूट उंच काळ्या पाषाणात कोरलेली जगदंबेची आसनस्थ मूर्ती आहे. मूर्ती शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. गाभाऱ्याबाहेर होमकुंड आहे. तो महाष्टमीच्या उत्तररात्री व नवमीला भल्या पहाटे मोकळा केला जातो.

जेष्ठ पुरोहित पांडे यांच्या माहितीवरून देवी भागवतात या स्थळाचा उल्लेख सापडतो. मर्यादा पुरुषोत्तम श्रीराम वनवासात असताना त्यांनी येथील आदीशक्तीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना केली असल्याची अख्यायिका आहे. सुमारे साडेतीनशे

वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात येथील मोरे घराण्यात देशमुखी बहाल करण्यात आली तेव्हापासून मंदिराची व्यवस्था, मूर्तीपूजेचा मान मोरे-देशमुख घराण्याकडे आहे. त्यासाठी देवस्थानला सुमारे शंभर एकर शेतजमीन दान देण्यात आली होती. याच कालावधीत दूर दृष्टीकोनातून मंदिर परिसरात सिंचन तलावाची निर्मिती करण्यात आली. मंदिराच्या आवारात दोन दगडी दीपमाळा असून विजयादशमीच्या दिवशी त्यावरच्या लखलखत्या दिव्यांमुळे आसमंत उजळून निघते. मंदिराबाहेर दक्षिणमुखी मारुतीरायाचे मंदिर आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला खर्जूल्या देवीचे स्थान आहे.

येथे वर्षातून चैत्रमासी यात्रा व अश्विन महिन्यांतील शारदीय महोत्सव साजरे होतात,



कालौघात यात्रेचे स्वरूप कमी झाले असले तरी नवरात्रौत्सव मोठ्या उत्साहात भक्तिभावाने साजरा होतो. नऊ दिवसांच्या यात्रेच्या काळात मंदिर परिसरात प्रसादाची तसेच इतरही अनेक प्रकारची दुकाने थाटली जात जातात. वेदमुनी जीवनगुरु जोशी, जोशी यांच्या पौरोहित्याखाली सकाळ-संध्याकाळ आरती, रुद्राभिषेक, षोडशोपचार पूजा, समशती, अथर्वशीर्ष, श्रीसुक्त, श्रीभवानी सहत्वनाम पाठ तसेच नवार्ण पारायण जप, वेद व यजुर्वेद संहिता इत्यादी दैनंदिन धार्मिक कार्यक्रम होतात. भाविकभक्त भोगीचे कर्यक्रम करतात. अन्नदाते महाप्रसादाचे आयोजन करतात. मंदिरात हजारो भाविक नवू

दिवस धरणे पारण्याचे उपवास करतात. नवरात्रोत्सवात.

महाअष्टमी व नवमीला मोठे महत्त्व :

रात्री कुमारिका व होम पूजा करण्यात येते. याकाळात गाभाऱ्यात देवीचे दर्शन बंद असते. दुसरे दिवशी (नवमीला) पहाटेसच होमकुंडात कोहळ्याची पूर्णाहुती दिली जाते. (पूर्वी अजबळी दिला जात असे.) त्यानंतर मातंग समाजातील महिलांच्या परडी पूजनाने पारणे सोडतात. जगदंबा मातेच्या मंदिरात रावरंक, उचनीच भेदभाव बाजूला सारून मातंग समाजातील महिलेची परडी पूजनाची शेकडो वर्षांपासूनची परंपरा आजही कायम आहे.

उत्सवात सर्व जातीधर्माचे लोक सहभागी असतात. संस्थानतर्फे भाविकांची व्यवस्था केली जाते. पोलिस बंदोबस्त चोख असतो. अलोकडच्या काळात भाविकांसाठी सोयीसुविधांसह अनेक विकासकाने झाली. सध्या संस्थानाचे अध्यक्ष माजी आमदार गुलाबचंद राठी, उपाध्यक्ष भगवानराव देशमुख सचिव प्रल्हादराव देशमुख, सहसचिव नरामदेवराव शेवाळे, कोषाध्यक्ष प्रमोद पांडे, सुभाषचंद्र तिवारी, विठ्ठल देशमुख यांच्यासह विश्वस्त मंडळ संस्थानचा कारभार पहात आहेत.

शारदीय नवरात्रोत्सव काळात जगदंबेच्या दर्शनाला जाण्यासाठी जिंतूर आगारातून एसटीच्या फेल्या सुरू असतात. शिवाय अनेक खाजगी वाहनांची जा-ये सुरू असते.

सेवा संकल्प अभियानांतर्गत विद्यार्थ्यांना कायदेविषयक मार्गदर्शन

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी, : मुलींवरती अत्याचारांचे प्रसंग वाढत आहे त्याकरिता बरीच कारणे जरी असेल तरी महत्त्वाचे कारण म्हणजे तुम्ही नाही म्हणत नाही व त्याचाच फायदा समाजातील दुष्कर्म व्यक्ती द्वारे घेतला जातो. त्यामुळे योग्य वेळेस सुरुवातीलाच मनाच्या इच्छे विरुद्ध होणाऱ्या गोष्टीला नाही म्हटले पाहिजे म्हणून "नाही म्हणणे शिका"असे मार्गदर्शन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश भूषण एम. काळे यांनी केले.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एम . सादरानी यांच्या मार्गदर्शनानुसार अनुसूचित जाती मुलींचे शासकीय निवासी शाळा ,मानवत तालुका मानवत जिल्हा परभणी येथे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा संकल्प अभियानांतर्गत कायदेविषयक जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी न्या.भूषण काळे बोलत होते.

यावेळी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शासकीय वस्तीगृह मानवत, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले वस्तीगृह, मानवत व अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय निवासी शाळा मानवत येथील विद्यार्थी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना पोक्सो कायदा, महिलांसाठी असलेले कायदे तसेच विविध फौजदारी कायद्यांची माहिती देण्यात आली. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत मिळणाऱ्या मोफत विधी सेवा आणि त्यासाठीच्या पात्रतेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

न्या. भूषण काळे यांनी विद्यार्थ्यांना कायद्याचे शिक्षण आणि त्यातील करिअरच्या संधींबाबतही माहिती दिली. वकील, न्यायिक सेवा आणि कायदे क्षेत्रातील विविध रोजगाराच्या संधींचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी आतापासूनच अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन त्यांनी केले.

महिला, अनुसूचित जाती-जमातीतील नागरिक तसेच वार्षिक उत्पन्न तीन लाख रुपये किंवा त्यापेक्षा कमी असलेल्या पात्र व्यक्तींना जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत मोफत कायदेशीर मदत मिळू शकते. नागरिकांना कायदेविषयक अडचणी आल्यास त्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी येथे संपर्क साधावा. तसेच विधी सेवा मिळविण्यासाठी १५१०० या टोल फ्री क्रमांकाचा वापर करावा, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त राजू एडके यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा संकल्प अभियानाची माहिती कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री अंजनीकर साहेब यांनी दिली व मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी श्री घुगे सर ,श्री शिंदे सर, श्रीमती भोसले मॅडम ,श्रीमती ठाकूर मॅडम व संबंधित कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

नवरात्रोत्सवात माणुसकीचा जागर; नऊ विद्यार्थिनींना शैक्षणिक मदत



छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने 'चला रंगूया माणुसकीच्या रंगात' या सामाजिक भावनेतून एनजीओ बोधी ट्री एज्युकेशनल फाउंडेशनच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या 'नऊ दिवस, नऊ मुलींना शैक्षणिक मदत' या उपक्रमांतर्गत छत्रपती हायस्कूल, विजयनगर येथील नऊ गरजू व होतकरू विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. बाबासाहेब पैठणे यांच्या हस्ते विद्यार्थिनींना प्रत्येकी एक पेन व सहा रजिस्टर देण्यात आले. आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थिनींच्या शिक्षणात अडथळे येऊ नयेत आणि त्यांच्या स्वप्नांना बळ मिळावे, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. उत्सव साजरा करताना सामाजिक बांधिलकी जपून गरजू मुलींच्या शिक्षणाला हातभार लावणे, हीच स्त्रीशक्तीच्या सन्मानाची खरी भावना असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

यावेळी विजय जैन, बाबासाहेब चित्रक, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक राजेंद्र चव्हाण, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निर्मला व्यवहारे, समाजभूषण रामदास वाघमारे, राजेश आंधळे, वर्षा मस्के यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

वही-पेनच्या रूपाने विद्यार्थिनींच्या स्वप्नांना बळ देणारा हा उपक्रम सामाजिक संवेदनशीलतेचा आणि माणुसकीचा प्रेरणादायी आविष्कार ठरला.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911